# *शिर्षक*

## प्रसंग- आदरणीय मोठ्या भाऊचे जिल्हा वकील संघ, जळगाव यांनी केलेल्या सत्काराला उत्तर देतांना भाषण

*दि. २६-०१-२००९, स्थळ - जिल्हा वकील संघ सभागृह, जळगाव*

~~*आपले मोठे भाऊ म्हणजे भवरलालजी हे मुळातच अनुभवांची खाण आहेत. महामुनींच्या भाषणानंतर आभाराचे चारच शब्द सांगताना त्यांचे जे विचार आपल्यासमोर आले ते पाहता त्यावरचे त्यांचे मुरलेले खोल चिंतन जाणवते. आजच्या जीवनात नकारात्मकता पुरेपूर भरुन वाहते. त्यापासून कटाक्षानं दूर कां रहावं, कसं रहावं याबद्दलचे त्यांचे विचार मनात खोलवर जातात आणि आपल्याला प्रत्यक्ष कृती करायला उद्युत करतात.*~~

~~*वेचा ही मौक्तिकं-मुठी भरभरुन!*~~

आदरणीय न्यायमूर्ती मा. व्यासपीठ, माझ्या मित्रांनो, उज्ज्वलने सांगितल्याप्रमाणे मी वकिली तशा अर्थानं केली नाही, फक्त रायसोनी वकिलांच्या काही ब्रीफ्स दोन महिन्यांसाठी कोर्टात चालवल्या. पण वकिलीचा जीवनात पुष्कळ उपयोग झाला. दोन-तीन वर्षापासून जिल्हा वकील संघाचे म्हणणे आहे की, "भाऊ आपण आमच्याकडे यायला पाहिजे." मी एक नाही तर, दुसरे कोणतेही कारण काढून टाळू शकलो असतो. अगदी प्रामाणिकपणे सांगतो, त्यांनी आत्ता आपल्याला आव्हान करुन सांगितले आहे की, आपण प्रामाणिकपणे बोलायचं. (हशा...) कदाचित हा कार्यक्रम मी टाळण्याचं कारण असंही राहीलं असतं ज्याप्रमाणे दोन घड्याळं कधी मिळत नाही, तसे दोन हुशार माणसं हेही एकमेकांशी सहमत होत नाहीत. वकील संघात सर्वांचे एकमत होते की, 'भाऊंचा सत्त्कार करावा', याचे मला आश्चर्य वाटले, कारण त्याबाबत एकमत होईल की नाही, याबद्दल माझ्या मनातच शंका होती, म्हणून येण्याचे टाळणार होतो! (टाळ्या...)

पण मित्रहो, मी वकिली पेशात येण्याचा आणि त्यात न राहण्याचा उद्योग केला, तो का केला? याचे गुपीत सांगून मी थांबणार आहे. वकिलीत येण्याचा उद्योग करायचं कारण रायसोनी वकीलच होते. रायसोनी वकील म्हणाले की, "भवरलालजी तुम्ही दोन महिने झाले. माझ्याबरोबर काम करीत आहात. मी तुम्हाला बॉन्ड पेपरवर लिहून देतो की, येत्या पाच वर्षात तुम्ही जळगावातल्या पहिल्या पाच वकिलांपैकी एक राहाल!

त्यामुळे तुम्ही इथे राहायलाच हवे आणि हे खरे तर तुमचेच क्षेत्र आहे”, असा त्यांचा आग्रह होता. वडीलकीचा आग्रह होता म्हणून त्या विषयाकडे मी वळलो पण मग त्यातून बाहेर निघालो कसा? वकिली चालू का ठेवली नाही, तेही सांगतो. त्या काळात वाचन करीत असताना जिना आणि न्यायाधिश यांच्यातील एक संवाद माझ्या वाचण्यात आला.

जिना हे जवळजवळ सहा तास युक्तीवाद करत होते, My lord, you are erred, My lord you are mistaken , असे करता करता प्रत्येक पंधरा मिनिटानंतर न्यायाधिशांनीच कशी चूक केली आहे, हे त्यांना पुनः पुन्हा सांगत होते. न्यायाधिशांच्या पेशन्सची काही मर्यादा असते. त्या मर्यादेच्या दृष्टीने जज कंटाळून त्यांना म्हणाले की Mr. Jeena why don’t you come here and I go there, because you are erring everywhere, and you are telling me that, I am erring everywhere, then why do you do that? He said ‘no sir, I don’t mean to dis-respect you. I am not going there, because I have no capacity to listen to non-sense, though I have unlimited capacity to talk non-sense (हशा आणि टाळ्या....) म्हणजे ज्यावेळी वकील बोलत असतो, त्यावेळी तो ऐकत नसतो.

मित्रहो, उज्ज्वलने दिलेला फॉर्मुला जर सर्वांनी वापरण्याचे ठरविले तर, आपल्यापैकी पन्नास टक्के लोक हे रोजगारापासून वंचित राहतील. याचे कारण असे आहे की, आशिलाच्या दोन बाजू तर असतातच आणि त्यातली एकच खरी असते. ५०% time you are anywhere engaged to defending something which is not true as per the law, or can not be proved otherway, त्यामुळे मला असे वाटते की, पन्नास टक्के आजच्या काळामध्ये आणि या उतरतीच्या आणि मंदीच्या काळामध्ये पन्नास टक्के बेरोजगारी ही अनपेक्षित आहे (हशा...) तुम्ही म्हणत असाल की, मी उज्ज्वलला अरे, तुरे का म्हणतो आहे, वयाच्या दृष्टीने वडीलकीचा अधिकार मला आहे आणि दुसरे असे की, उज्ज्वल मला तितका जवळचा आहे म्हणून!

मित्रहो, प्रामाणिकपणाने तुम्हाला यश संपादन करता येते या गोष्टीचा अनुभव मी एक वेळा नव्हे, हजार वेळा नव्हे, लाखो वेळा आणि प्रत्येक दिवशी आणि प्रत्येक क्षणी घेतो.(टाळ्या...) माझी या बहात्तराव्या वर्षी इतक्या वर्षाच्या अनुभवानंतर वारंवार तोच अनुभव आल्यामुळे ही खात्री झाली आहे की, खऱ्या अर्थाने तुम्ही जर काम करणार असाल, तर तुम्हाला यश देणे हे कुणाच्याही हातात नसून, यशालाच तुमच्याकडे येणं

हे क्रमप्राप्तच आहे! (टाळ्या...) परंतु तो मार्ग जो आहे तो मात्र थोडा लांबचा आहे. It is no shortcut to success, it's a  longrun to success आणि तेवढा संयम आपल्याकडे नसतो, म्हणून आपण जवळचा मार्ग निवडतो. आपण विचाराल की, "भवरलालजी, हे सत्य आहे का? व्यवसायात राहून तुम्ही हे म्हणू शकता का?" तर हा स्वतंत्र चर्चेचा विषय आहे, एखाद्यावेळी चर्चा करण्यासाठी बोलवा, आज मला सत्कारासाठी बोलावलं आहे; त्यामुळे मी आपले सर्वांचे आभार मानतो आणि आपण एवढ्या प्रेमानं आणि एवढे विद्‌वतजन लोक असतानासुद्धा माझ्यासारख्या एका अनभिज्ञ माणसाला इथं बोलावलं आणि सत्त्कार केला. याबद्दल आपणा सर्वांचे पुनश्च आभार मानतो.

जय हिन्द! जय महाराष्ट्र!